**विधानमंडळाच्या सदस्यांची देयके अवितरीत अनुदानातून पारित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन परिपत्रक क्र. विमंस-२०१०/ प्र.क्र.४०/अर्थसंकल्प-४
मंत्रालय मुंबई ४०००३२.
दि. २१ जून २०१०.

विधानसभेच्या सदस्यांकरीता ''लेखाशिर्ष २०११ ००२२- विधान सभेचे सदस्य'' व विधान परिषदेच्या सदस्यांकरीता ''लेखाशिर्ष २०११ ००५८ विधान परिषदेचे सदस्य'' या लेखाशिर्षाखाली वेतन व देशांतर्गत प्रवास या करीता विधान मंडळ सचिवालयाकडून तरतूद करण्यात येते. या तरतूदीतील निधी आहरीत करण्याकरीता विद्यमान विधानसभा व विधान परिषद सदस्य हे स्वत: व माजी विधानसभा व विधान परिषद सदस्यांकरीता कोषागार अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकरी आहेत.

सदर लेखाशिर्षाकरीता आहरण व संवितरण अधिकारी यांची संख्या मोठी असून आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून आहरीत करण्यात येणाऱ्या रकमेत निश्चितता नाही, त्यामुळे लेखाशिर्षनिहाय खर्चाचे अचूक अंदाज बांधणे शक्य होत नाही. सदर कारणामुळे विधान मंडळ सचिवालयास आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना तरतूदीचे वितरण करण्यात अडचण येते. या कारणास्तव ''लेखाशिर्ष २०११ ००२२- विधान सभेचे सदस्य'' व ''लेखाशिर्ष २०११ ००५८ विधान परिषदेचे सदस्य'' या लेखाशिर्षाखाली ंअवितरीत तरतूदीमधून निधी आहरीत करण्याची बाब विधान मंडळ सचिवालयाने प्रस्तावित केली आहे. विधान मंडळ सचिवालयाने प्रस्तावित केल्यानुसार उपरोक्त नमूद लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीव्दारे अवितरीत निधीमधून निधी आहरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

''लेखाशिर्ष २०११ ००२२- विधान सभेचे सदस्य'' व ''लेखाशिर्ष २०११ ००५८ विधान परिषदेचे सदस्य'' या लेखाशिर्षाकरीता अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीव्दारे अवितरीत तरतूदीमधून खर्च करण्याची सुविधा या परिपत्रकाव्दारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sd/-

**(सु.प्र.कानडे)**
**सह सचिव, वित्त विभाग**

**प्रति,**
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे व उपमुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सचिव,
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
संचालक लेखा व कोषागारे, मुंबई,
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण भवन, नवी मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व कोषागार अधिकारी,
सर्व उपकोषागार अधिकारी,
निवडनस्ती, वित्त विभाग, अर्थसंकल्प-४.